**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# मंथन

आपल्या देशातील लोकशाहीने यंदा एकसष्टीत पदार्पण केले. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशाची घटना अमलात आली. तिथपासून केलेला हा साधा सरळ गणिती हिशेब. कागदावर सगळेच हिशेब सोपे वाटतात. मात्र, व्यवहारातील गणित विलक्षण व्यामिश्र आणि गुंतागुंतीचे असते. त्यातही, भारतासारख्या एका अतिशय प्राचीन, बहुविधतेने भरलेल्या, प्रांतिक, भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, जातीय, राजकीय अस्मितांच्या रसरशीत जाणिवांनी परिप्लुत समाजातील हिशेब मती गुंग करणारेच असतात. भारतीय मनच मुळात विलक्षण परंपरानिष्ठ, कर्मकांडप्रिय, आणि चौकटबद्ध. भरीस भर म्हणून की काय, राजेशाहीचा अंमल प्रदीर्घ काळ नांदलेला. त्या राजेशाहीलाही पुन्हा धार्मिकतेचे अधिष्ठान, कारण, राजा हा विष्णूचा अवतार ! राजेशाहीचा अंत घडून आला तो परकीय सत्तेने या भूमीत बसवलेल्या बस्तानातून. परंपरेचा पगडा इतका निबर की, परभूमीतून आलेले हे गोरे शासकही एतद्देशीयांना परद्वीपस्थ प्रभूच भासले. साहजिकच, जीवनविषयक एकंदर भूमिकाच 'शासक-शासित' नातेसंबंधांना रूढावलेली. सत्ताधीश म्हणजे मायबाप. आपल्या कल्याणाचा भार राजसत्तेनेच वाहायचा, हीच मुख्य दृष्टी. परकीय अंमलाचे जोखड फेकून देण्यासाठी उभारल्या गेलेल्या लढ्यानंतर असा हा समाज एकदम लोकसत्ताक राज्यप्रणालीच्या विश्वात ढकलला गेला. एवढे मोठे व्यवस्थात्मक आणि मूलभूत स्थित्यंतर त्या मानाने अल्पकाळातच घडून आले. त्यामुळेच असेल कदाचित पण, प्रातिनिधिक प्रजासत्ताक व्यवस्थेची काही पायाभूत मूल्ये आपल्या समाजजीवनात आणि व्यवहारात रुळलेली आजही अभावानेच दिसतात. कायद्याचे राज्य आणि कायद्याची प्रतिष्ठा सर्वोच्च मानण्याची मानसिकता, कायदे तयार करण्यात लोकनियुक्त प्रतिनिधींचा प्रगल्भ सहभाग, लोकाभिमुख शासन, व्यक्तिस्वातंत्र्य, इहवादी दृष्टिकोन, विवेकवादावर निष्ठा, समता, परमतसहिष्णूता, दंडशक्तीपेक्षाही विचारशक्तीवर भरवसा, चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सुटू शकतात, जटिल भासणा-या समस्यांचीही उकल होऊ शकते यांबाबत विश्वास... अशांसारख्या काही मूलभूत लोकशाही मूल्यांचा परिपोष



आपल्या रोजच्या समाजजीवनात सजगपणे होत असल्याचा प्रत्यय आताशा दुर्मिळच होत चाललेला आहे. या सगळ्या मूल्यांच्या बरोबर विरुद्ध आणि विपरित मूल्यांचाच वास्तवात सुकाळ दिसतो. ठिकठिकाणी दिसणारी संघर्षमय परिस्थिती याच वस्तुस्थितीकडे निर्देश करते. आपल्या व्यवस्थेत मुळातच नाना प्रकारची विषमता ठासून भरलेली असल्याने सर्व प्रकारच्या विकासप्रक्रियेतून कोणते ना कोणते समाजसमूह वंचित राहतातच. वंचनेमधून निपजतो असंतोष आणि असंतोषामधून संघर्ष. समस्येवर तोडगा शोधून काढण्याच्या प्रयत्नांचा प्रवास मग, बघता बघता, चर्चेच्या टेबलाकडे होण्याऐवजी रस्त्यावरील प्रक्षोभमय निदर्शने-मोर्चांच्या मार्गाकडे होतो. त्यातून प्रश्न चिघळतात. चिघळलेली जखम तरी एकवेळ बरी होते, पण, चिघळलेले प्रश्न काही सुटतच नाहीत. एकंदर काय, सगळे अखेर 'जैसे थे'याच अवस्थेला येऊन ठेपते. 'रस्त्यावर उतरल्याखेरीज समस्यांची तडच लागत नाही', अशी एक घुसमटमय हताशपणाची भावना त्यातून व्यापक स्तरावर पसरते. यातून होते ते इतकेच की, चर्चा-मसलतीच्या माध्यमातून आपले प्रश्न आपणच सोडविण्याच्या पर्यायावरील जनसामान्यांचा विश्वास उडायला लागतो. मग ज्यात त्यात राजकीय व्यवस्थेतील मध्यस्थांची गरज भासणे सुरू होते. साध्या प्रश्नांचे मग रीतसर राजकारण सुरू होते. त्याला लगोलग भाषिक, जातीय, धार्मिक, प्रादेशिक, वांशिक अस्मितांचे धुमारे फुटतात. काट्याचा नायटा होतो. जनसामान्यांचा अडचणींचे निराकरण घडवून आणण्याचे साधन म्हणजे राजकारण ही भावना लयाला जाऊन,

*(पृष्ठ १४ वर पाहावे)*

**निवेदन**

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

इतिहास

# वारसा आणि वसा समाजपुरुषांचा...

ब्रिटिश सत्ता भारतामध्ये स्थिरावणे, हे खरोखरच एक बहुआयामी स्थित्यंतर होते. मराठा साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर इथे इंग्रजी अंमल सुरू झाला, हा पहिला बदल शुद्ध राजकीय स्वरूपाचा होता. मात्र, या बदलाचे इथल्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत उमटलेले पडसाद बहुविध स्वरूपाचे होते. भारतीय समाजात सुरू झालेले नवजागरण या स्थित्यंतरातून निपजले. या नवजागरणामुळे सर्वत्र एक प्रकारची घुसळण सुरूझाली. आपली परंपरा, धर्मविचार, कर्मकांडे, श्रद्धाविश्व, जीवनविषयक धारणा, मूल्ये यांचा पुनर्विचार त्या घुसळणीमधून प्रसवला. ब्रिटिशांनी पाडाव केलेल्या मराठा सत्तेचे केंद्र पुण्यात म्हणजेच महाराष्ट्रात असल्याने महाराष्ट्र आणि त्याच्याच आगेमागे बंगाल या दोन प्रांतांत नवचिंतनाची ही प्रक्रिया तुलनेने अधिक तीव्रतेने गतिमान बनली. एल्फिन्स्टनसारख्या ब्रिटिश अंमलदाराने सुरू केलेले प्रयत्न या प्रक्रियेस जसे साहाय्यभूत ठरले त्याचप्रमाणे या प्रांतातील समाजमनस्क लोकोत्तर व्यक्तींनी जारीने सुरू केलेले व्यापक नवशोधनही तिला पूरक ठरले.

नवचिंतकांच्या या पिढीमध्ये ज्येष्ठत्वाने निर्देश केला पाहिजे तो 'लोकहितवादी' गोपाळ हरी देशमुख यांचा. १८२३ हे त्यांचे जन्मसाल. त्यांच्यानंतर चारच वर्षांनी, म्हणजे, १८२७ साली महात्मा जोतीबा फुले यांचा जन्म झाला. उच्चवर्णीयांसह एकंदरच समाजसमूहांत बद्धमूल झालेले पारंपरिक साचलेपण, ठोकळेबाजपणा, कर्मठ जीवनदृष्टी यांच्यावर 'लोकहितवादीं'नी 'शतपत्रां'मधून टीकेचे कोरडे ओढले. तर, दलित, स्त्रिया आणि शेतकरी या तीन शोषित समाजघटकांना उन्नयनासाठी आवश्यक असणारी ऊर्जा पुरवितानाच उच्चवर्णीयांच्या शोषक वृत्ती-कृतींवर जोतीबांनी आसूडाचे फटके ओढले. या दोघांच्या अशा निर्मम फेरतपासणीमुळे महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवनाचीही पुनर्मांडणी १९व्या शतकाच्या मध्यानंतर जोमदारपणे सुरू झाली.



अस्तित्वात असलेली आणि प्रदीर्घ काळ नांदलेली कोणतीही जुनी व्यवस्था ढासळू लागते त्या वेळी समाजजीवनात स्वाभाविकतःच एक पोकळी निर्माण होते. ही पोकळी भरून काढण्यासाठी कर्तव्यतत्पर होणे हेही एक मोठे ऐतिहासिक उत्तरदायित्व असते. ही जबाबादारी तितक्याच समर्थपणे पेलणाऱ्या १९व्या शतकातील तीन लोकोत्तर पुरुषांच्या कार्यकर्तृत्वाचा विवेचक आलेख 'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ' या संशोधनपर ग्रंथात रेखाटलेला सापडतो. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, न्यायमूर्ती काशिनाथ त्र्यंबक तेलंग आणि न्यायमूर्ती नारायण गणेश चंदावरकर हे ते तीन समाजपुरुष. या तीनही न्यायमूर्तींच्या कर्तृत्वाचा विवेचक अभ्यास न्यायमूर्ती नरेन्द्र चपळगावकर यांनी मोठ्या रेखीवपणे मांडलेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीशपद भूषविण्याचा बहुमान तेलंग-रानडे-चंदावरकर या तिघांनाही लाभला. तिघांचीही वैचारिक प्रणाली जवळपास एकाच कुळातील. तिचे नाते बव्हंशी 'लोकहितवादीं'च्या 'स्कूल'शीच जवळीक साधणारे. रानड्यांपेक्षा तेलंग आठ वर्षांनी तर, तेलंगांपेक्षा चंदावरकर तीन वर्षांनी लहान. निर्याणाच्या क्रमात मात्र तेलंग अन्य दोघांच्या पुढे गेले. १८९३ साली तेलंग निवर्तले. तेलंगांनंतर आठ वर्षांनी रानड्यांचे देहावसान झाले. चंदावरकर वारले १९२३ साली.

इथे एक आवर्तन पूर्ण होते. १८२३ ते १९२३ असे पुऱ्या शतकभराचे हे आवर्तन होय. अंतःशोधन, समाजसुधारणा आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी करावयाच्या प्रयत्नांची दिशा यांच्या संदर्भातील एक प्रणाली या संपूर्ण कालावधीत महाराष्ट्रात रुजली आणि नांदली. १८२३ हे 'लोकहितवादीं'चे जन्मसाल तर, १९२३ हे न्यायमूर्ती चंदावरकरांच्या देहावसानाचे वर्ष. एका अर्थाने, एका विचारप्रणालीच्या शतकी वाटचालीची सांगता चंदावरकरांच्या मृत्यूने घडून आली. १९०१ साली झालेल्या न्यायमूर्ती रानड्यांच्या मृत्युनंतर नेतृत्वाची धुरा लोकमान्य टिळकांच्या खांद्यावर निर्विवादपणे आली. ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखालून देशाची सुटका करून घेण्याच्या प्रयत्नांचे एक पूर्णतः नवीन पर्वच टिळकांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले. १९२० साली टिळक गेले आणि स्वातंत्र्यसंग्रामाची सारी सूत्रे महात्मा गांधींकडे गेली. एका नवीन पर्वाचा तो प्रारंभ होता.

**पायाभरणीचे महत्कार्य**

लोकमान्यांच्या लढाऊ संघर्षाचे पर्व बघण्यास रानडे हयात नव्हते. तर, गांधीजींच्या सत्याग्रहप्रधान असहकारितेचा लढा सुरू होण्यापूर्वीच चंदावरकरांनी इहलोकाचा निरोप घेतला होता. रानडे-तेलंग-चंदावरकर या तिघांची पिंडप्रकृती, पेशा आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी करावयाच्या प्रयत्नांसंदर्भातील भूमिका व विचारसरणी लोकमान्य तसेच महात्माजींच्या पंथांशी मिळती-जुळती असावी अशी अपेक्षाच नाही. त्यांचा काळच मुळात भिन्नभिन्न होता हे एवढेच कारण या मागे नाही. रानडे-तेलंग-चंदावरकर या त्रयीचे कर्तृत्व भरात असणारा कालखंड आणि लोकमान्य-महात्माजींच्या व्यक्तित्व-कर्तृत्वाने भारलेला कालखंड या दोहोंतील व्यापक सामाजिक प्रेरणाच मुळात निराळ्या होत्या. परंतु, १९व्या शतकाच्या सहाव्या दशकापासून ते २०व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांपर्यंतच्या कालावधीदरम्यान या तीन न्यायमूर्तींनी ज्या वैचारिक पर्यावरणाचा, संस्थात्मक कार्याचा आणि सर्वांगीण कृतिप्रवणतेचा परिपोष महाराष्ट्रात (व पर्यायाने भारतातही) प्रयत्नपूर्वक केला ते सारे संचित लोकमान्य आणि महात्माजींच्या संघर्षपर्वात त्यांच्या हाताशी आले, हे मात्र निर्विवाद. एका अर्थाने, रानडे-तेलंग-चंदावरकर या त्रिमूर्तीने पायाभरणीचे महत्कार्य अतिशय नेटाने पार पाडले.

ब्रिटनसारख्या एका सर्वस्वी वरचढ आणि प्रगत राजसत्तेशी गाठ पडलेल्या, परकीय आणि म्हणूनच पूर्णतः नवीन अशा व्यवस्थाप्रणालीशी साक्षात संबंध आल्यामुळे सैरभैर झालेल्या हिंदुस्थानसारख्या मागास, परंपरानिष्ठ, श्रेणीप्रधान आणि बाह्य जगातील बदलत्या वा-यांपासून अस्पर्शित राहिलेल्या देशातील समाजास एकदमच संघर्षप्रवण बनवून स्वातंत्र्याचा लढा उभारणे ही अशक्य कोटीतील बाब होती. त्यासाठी प्रथम गरज होती ती अंतर्बाह्य हाललेल्या समाजाची समयोचित पुनर्रचना करण्याची. ही फेररचनाही पुन्हा संस्थात्मक आणि मूल्यात्मक अशा उभय पातळ्यांवर करणे अत्यावश्यक होते. एका वेगळ्या पद्धतीने 'लोकहितवादी' आणि महात्मा जोतीबा फुल्यांनी त्या दिशेने प्रयत्न सुरू केलेच होते. रानडे आणि तेलंगांनी प्रथम तर त्यांच्या पाठोपाठ चंदावरकरांनी तीच पालखी आपल्या खांद्यांवर घेतली. पुनर्मांडणीचे ते सारेच पर्व विलक्षण प्रेरणादायक आहे.



ब्रिटिशांच्या राजवटीद्वारे आधुनिक विचारविश्व आणि संस्थात्मक जीवनाशी परिचय घडून येण्याची खिडकी भारतीयांसाठी उघडली गेलेली असली तरी अखेर हे पारतंत्र्यच आहे, याची जाणीव त्याच राजवटीच्या सेवेत असणा-या 'लोकहितवादी' तसेच न्यायमूर्ती रानड्यांनाही होती. परंतु, परकीय सत्तेचे जोखड झुगारू न देण्यासाठी समाजास कृतिप्रवण बनवायचे तर प्रथम समाजमनावर स्वावलंबनाचा मूलभूत संस्कार घडवणे अत्यावश्यक होते. राजसत्तेवरील सर्व प्रकारचे अवलंबन घटवल्याखेरीज स्वावलंबनातून निपजणा-या स्वायत्ततेचा अनुभव समाजाला येत नाही. राजसत्तेवर विसंबून नसलेल्या स्वायत्त नागरी समाजाची निर्मिती करावयाची तर, मुळात, आपल्या समस्यांची तड लावण्यासाठी लोकांनी स्वयंप्रेरणेने एका व्यासपीठावर एकत्र येऊन प्रवर्तित केलेल्या नागरी संस्थांची जडणघडण, जपणूक आणि व्यवस्थापन करण्याची संस्कृती समाजात रुजणे निकडीचे ठरते. न्यायमूर्ती रानड्यांनी तत्कालीन महाराष्ट्रात संस्थाकारणाचा जो उद्योग आरंभला त्यामागील त्यांची तत्त्वदृष्टी आणि भूमिका हीच होती. रानड्यांच्या बरोबरीनेच तेलंग आणि चंदावरकरांनीही नानाविध संस्थांच्या स्थापना-व्यवस्थापनात सक्रिय सहभाग घेत रानड्यांनी पायाभरणी केलेल्या संस्थाकारणाचा यज्ञ पुढे चालू ठेवला. समाजसुधारणा, लोकशिक्षण, ज्ञानप्रसार आणि ग्रंथनिर्मिती, राजकीय चळवळी अशांसारख्या विविधांगी क्षेत्रांमध्ये कार्यरत असणा-या संस्था समांतर पद्धतीने स्थापन करू न सर्वसामान्यांच्या ठायी असणा-या कारक शक्तींना सामूहिक स्वरू पात क्रियाशील बनवण्याचा जो एक प्रचंड प्रयोग या त्रयीने महाराष्ट्रात त्या काळात केला तो आजही तितकाच अनुकरणीय ठरतो.

सामाजिक व्यासपीठांच्या माध्यमातून समूहशक्तीचा आविष्कार घडण्यासाठीही पुन्हा समाजात काही किमान एकसंधता विद्यमान असावी लागते. अशा एकसंधतेस अडथळा ठरणा-या काही अंगभूत वैगुण्यांचे निराकरण करण्यास हात घालणे ही संस्थाकारण समाजात साकारण्याची पूर्वअट ठरते. त्यासाठी, प्रथम, या वैगुण्यांना प्रसवणा-या मानवी भावविश्वातील हिणकस भाग दूर करणे आवश्यक बनते. रानडे-तेलंग-चंदावरकर यांनी केलेले धर्मकारण या संदर्भात अभ्यासावयास हवे.

**सर्वांगीण नवचिंतनाची भूमिका**

भारतीय समाजावर धार्मिक श्रद्धा-समजुती-परंपरा-धारणांचा पगडा पूर्वापारच आहे. नाना प्रकारच्या निकृष्ट सामाजिक प्रथा-संकेतांची पाळेमुळे धर्मश्रद्धांमध्येच रुजलेली असल्याने, मुळात, समाजाच्या धर्मविषयक धारणाच उन्नत बनविणे अनिवार्य ठरते. रानडे, तेलंग आणि चंदावरकरांनी प्रार्थना समाजाच्या माध्यमातून केलेले धर्मचिंतनाचे प्रयत्न त्या दृष्टीने मूलगामी ठरतात. प्रार्थना समाजाच्या मूलतत्त्वांची सांगड महाराष्ट्रातील भागवतधर्मीय संतविचाराशी घालण्यात न्यायमूर्ती रानडे आणि डॉ. रा. गो. भांडारकर यांनी प्रगट केलेला प्रगल्भपणा तर केवळ अजोड होय. भागवत धर्मांतर्गत भक्तितत्त्वाला असलेले नीतीचे भरभक्कम अस्तर आणि लोकसंग्रहास त्यात असलेले अगत्य यांची जोड रानडेप्रभृती प्रवर्तित करू पाहत असलेल्या संस्थाकारणास पूरकच ठरली. त्याच वेळी, सार्वजनिक सभा आणि तिच्या त्रैमासिकाच्या माध्यमातून रानड्यांनी प्रवर्तित केलेले अर्थकारणविषयक चिंतन त्यांच्या संस्थाकारणास वेगळी अर्थवत्ता प्राप्त करून देणारे ठरले.


**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**




न्यायमूर्ती रानड्यांची सुधारणाविषयक दृष्टी सर्वगामी तर विचारप्रणाली ही समाजांतर्गत विविध घटकांच्या परस्पराश्रयी नातेसंबंधांची अचूक वेध घेणारी असल्यामुळेच तत्कालीन समाजाचे अर्थकारणही सुधारण्यास त्यांनी हात घातला. देशातील शेती आणि शेतकरी, भारतीय शेतीची निसर्गशरणता, अधूनमधून डोळे वटारणारा पाऊस, त्यापायी देशोधडीला लागणारा शेतकरी वर्ग, ब्रिटिश सत्तेच्या अंमलाखाली मरणपंथाला लागलेली ग्रामीण भागातील कारागिरी, त्यापायी शेतीवरील वाढलेला लोकसंख्येचा भार, हा भार घटवण्यासाठी उद्योगधंद्यांना बढावा देण्याची निकड अशांसारख्या विविध विषयांसंदर्भातील चिंतन-मननास त्यांनी चालना दिली. औद्योगिक प्रदर्शनांसारख्या उपक्रमांची कल्पना व्यवहारात राबविली. नवचिंतनाची प्रक्रिया ही अशी सर्वगामी असणे अत्यावश्यक असल्याची रानडे यांची धारणा या तीनही लोकाग्रणींच्या कार्यामध्ये स्पष्टपणे प्रतीत होते.

नवचिंतनाची संस्कृती समाजात दृढमूल होण्यासाठी एका अतिशय पायाभूत जीवनमूल्याची प्रतिष्ठापना व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवनात करणे निकडीचे असते. उदारमतवाद हे ते मूल्य. रानडे-तेलंग-चंदावरकर या तिघांनीही त्यांच्या जीवनाद्वारे उदारमतवादी जीवनप्रणालीचा जणू वस्तुपाठच समाजासमोर ठेवला. न्यायमूर्ती चपळगावकरांनी हा सारा इतिहास त्याच्या बारकाव्यांसह, विपुल तपशीलांनिशी, संकलित तपशीलाचे तर्कशुद्ध, संगतवार विश्लेषण करीत ग्रंथगत केलेला आहे. एका स्थित्यंतरप्रवण कालखंडाचा, त्या स्थित्यंतराचे शिल्पकार असणा-या लोकोत्तरांच्या कार्यकर्तृत्वाचा पट उलगडत मांडलेला चिकित्सक लेखाजोखा म्हणजे प्रस्तुत अभ्यास.

आजची आपली गरजही नेमकी हीच आहे. जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारतीय समाज एका नवीनच संस्कृती व मूल्यप्रणालीच्या संपर्कात येत आहे. या नवीन वास्तवाला सामोरे जात त्याला सामावून घेऊ शकेल अशा प्रकारे समाजजीवनाची पुनर्मांडणी करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. असेच आव्हान एके काळी समर्थपणे पेललेल्या समाजपुरुषांच्या वारशाचे स्मरण आज म्हणूनच अगत्याचे ठरते. त्यांचा वसा पेलण्याचे भान आजच्या पिढ्यांच्या मनीमानसी जागणे, हीच चपळगावकर यांच्या या अभ्यासाची उचित अशी फलश्रुती ठरावी. ■■

आरोग्य

# उपचारांच्या प्रतीक्षेत ग्रामीण आरोग्यसेवा

देशाच्या ग्रामीण भागांतील सार्वजनिक आरोग्य सेवासुविधांची दुरवस्था हा चिरंतन चिंतेचा विषय राहिलेला आहे. शहरी भागांतील नागरिकांना खासगी आरोग्यसेवेचा पर्याय निदान खुला तरी असतो. परंतु, ग्रामीण भागांतील - खास करून खासगी वैद्यकीय व्यावसायिक जिकडे फिरकलेलेही नसतात अशा दुर्गम प्रदेशांतील - नागरिक मात्र शासकीय आरोग्य सेवासुविधांवरच पूर्णतः विसंबलेले असतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजघटक, स्त्रिया आणि लहान मुलांची या बाबतीतील परवड अधिकच दुःसह असते; कारण, खासगी वैद्यकीय सल्लासेवा उपलब्ध असली तरी ती त्यांच्या खिशाला परवडणारी नसते. त्यामुळे, ग्रामीण आणि दुर्गम तसेच अति दुर्गम भागांतील सार्वजनिक वैद्यकीय सेवेचा दर्जा अव्वल राखणे, ही आपल्या देशात सातत्यानेच प्राधान्याची बाब राहिलेली आहे.

मात्र, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या जवळपास सहा दशकांतही या संदर्भातील दुरवस्थेचे निराकरण समाधानकारकरीत्या घडून न आल्याने अखेर केंद्र सरकारने पुढाकार घेऊन पाच वर्षांपूर्वी ‘राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान’ (नॅशनल रूरल हेल्थ मिशन) ही महत्त्वाकांक्षी योजना प्रवर्तित केली. तत्कालीन पंतप्रधानांच्या हस्ते १२ एप्रिल २००५ रोजी या अभियानाच्या कार्यवाहीचा नारळ फोडण्यात आला. आरोग्याच्या सार्वजनिक सेवासुविधा दुर्बळ असलेल्या १८ राज्यांवर या अभियानाचा मुख्य रोख आहे. २००५-०६ ते २०११-१२ असा सात वर्षांचा या अभियानाचा कालावधी होय. या कार्यक्रमाची अंमलबजावणी कशा पद्धतीने होत आहे, याची पाहणी करण्यासाठी तज्ज्ञांच्या एका आंतरराष्ट्रीय सल्लागार मंडळाकरवी अलीकडेच एक क्षेत्रीय अभ्यास करण्यात आला. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या या मध्यावधी मूल्यमापनाचा अहवाल अभ्यास मंडळाने ७ ऑगस्ट २००९ रोजी केंद्रीय आरोग्य मंत्रालयास सादर केला. या क्षेत्रीय अभ्यासाचे निष्कर्ष मोठे चिंतनीय आणि तितकेच चिंताजनकही आहेत.



मध्य प्रदेश, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या तीन राज्यांवर मध्यावधी मूल्यमापनादरम्यान लक्ष केंद्रित करण्यात आले होते. या तीन राज्यांतील पाच जिल्ह्यांमधील आरोग्य सुविधांची तपशीलवार पाहणी प्रस्तुत अभ्यासादरम्यान करण्यात आली. हा सारा अभ्यास नमुना पाहणी तत्त्वावर हाती घेण्यात आला होता. पाहणीसाठी निवडलेल्या जिल्ह्यांमधील आरोग्य सुविधा आणि ग्रामीण आरोग्य यंत्रणेमधील कर्मचारी यांचा प्रत्यक्ष भेटींद्वारे अभ्यास करण्यासाठी अनुरूप अशा प्रश्नावली वापरण्यात आल्या. या अभ्यासाची व्याप्ती बरीच मोठी असल्याने निवडलेल्या तीन राज्यांमधील ग्रामीण भागांत कार्यरत असणा-या प्राथमिक आरोग्य केंद्रांसंदर्भातील तपशीलाचाच काय तो परामर्श आपण या ठिकाणी घेणार आहोत.

अभ्यासादरम्यान भेटी देण्यात आलेले प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र स्वतंत्र इमारतीमध्ये कार्यरत असल्याचे दिसले तरी, नमुना पाहणीत अंतर्भाव असलेल्यांतील जवळपास ३५ टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती गावांच्या बाहेर असल्याचे आढळून आले. प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील सुविधांच्या बाबतीत मात्र सार्वत्रिक दैनाच सामोरी येते. शस्त्रक्रियांसाठी आवश्यक असणारी आयुधे उपस्थित असणारे एकही प्राथमिक आरोग्य केंद्र पाहणीदरम्यान आढळून आले नाही. तर, प्रसुतीसाठी लागणारी उपकरणे व साधने उपलब्ध असणा-या प्राथमिक आरोग्य केंद्रांचे एकूणांतील प्रमाण अवघे १६ टक्केच असल्याचे वास्तव प्रगट झाले. औषधांचा पुरवठा नियमितपणे होणा-या केंद्रांचे प्रमाण एकूणांत एक चतुर्थांशापेक्षा अंमळ अधिक, म्हणजे, केवळ २६ टक्के इतकेच असल्याचे दिसते. प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांसाठी खाटाच नसल्याचे चित्र १३ टक्के केंद्रांमध्ये दिसून आले तर, रुग्णांसोबत आरोग्य केंद्रावर येणा-या त्यांच्या नातेवाईकांसाठी साधी बसण्याचीदेखील सोय नसलेली १६ टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रे आढळली. पाणी, वीज, दूरध्वनी, वापरात असलेली वाहने यांसारख्या अत्यावश्यक सुविधाही मौजूद नसलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची टक्केवारीही २० टक्क्यांपासून (पिण्याचे पाणी तसेच अन्य वापरासाठीही पाणी नसलेली केंद्रे) ते ८१ टक्क्यांपर्यंत (वापरयोग्य वाहनच नसलेली केंद्रे) असल्याचे दुःसह वास्तव या पाहणीद्वारे सामोरे आले.

प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील मनुष्यबळाची स्थिती तरी काय आहे ? पाहणीदरम्यान भेटी देण्यात आलेल्या एकंदर प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी १३ टक्के केंद्रांवर डॉक्टरच नव्हते. आयुर्वेद, योगोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपथी या वैद्यकीय शाखांमधील उपचारपद्धतींवर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत भर देण्यात आला असूनही, या उपचारपद्धतींचा अवलंब करून रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टरच एकूणांतील ५८ टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रांवर पाहणीदरम्यान आढळून आले नाहीत. केवळ इतकेच नाही तर, परिचारिका नसलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांचीही टक्केवारी तितकीच (५८ टक्के) असल्याचे पाहणीअंती दिसले. जवळपास एक तृतीयांश प्राथमिक आरोग्य केंद्रांवर तर वॉर्डबॉयही नव्हता. एकही स्वच्छता कर्मचारी नसलेल्या केंद्रांची टक्केवारीही एकूणांत जवळपास एक पंचमांश असल्याचे या पाहणीचे निरीक्षण सांगते. डॉक्टरच्या रूपाने ग्रामीण सर्वसामान्यांना अहोरात्र वैद्यकीय सेवा उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रांचे एकूणांतील प्रमाण ६८ टक्के इतकेच असल्याचे वास्तव हा अभ्यास आपल्यासमोर मांडतो.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या मध्यावधी मूल्यमापनाद्वारे डोळ्यांसमोर उभे राहणारे हे चित्र सचिंत बनविणारे असेच आहे. ग्रामीण भागांतील सार्वजनिक आरोग्य सेवासुविधांचा दर्जा उंचावणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजघटक, स्त्रिया व मुलांना या पायाभूत सुविधांचा 'ॲक्सेस' उपलब्ध करून देणे आणि आरोग्यसेवांची उपलब्धता आणि गुणवत्ता यां संदर्भात शहरी आणि ग्रामीण विभागांत अनुभवास येणाऱ्या तफावतीची दरी कमी करणे, ही राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामागील उद्दिष्टे होत. वास्तवात, या योजनेचा कार्यकाल संपण्यास अवघ्या दोन वर्षांचाच काय तो कालावधी राहिलेला असतानाही व्यवहारातील ग्रामीण आरोग्याची यंत्रणा पूर्वीइतकीच दोषपूर्ण असल्याचा या पाहणीचा निष्कर्ष असेल तर काय म्हणायचे ? ग्रामीण भारतातील सार्वजनिक आरोग्य सेवाच आज उपचारांच्या प्रतीक्षेत असल्याने विकास योजनांवर खर्च किती झाला यापेक्षाही झालेला खर्च किती कारणी लागला हे तपासणेच अखेर महत्त्वाचे ठरते, हाच धडा या पाहणीने आपल्यासमोर ठेवलेला आहे. ■■



*(पृष्ठ ४ वरून)*

मग, राजकारण हेच साध्य बनते. राजकीय स्वार्थसाधन हेच ज्यांचे अंतिम ध्येय असते असे सारे घटक मग सगळ्या प्रकारच्या क्लृप्त्या वापरतात. तेथवर सुप्तासुप्त असलेल्या सर्व प्रकारच्या अस्मितांना जाणीवपूर्वक खतपाणी घातले जाते. यातून मूळ दुखणे बरे होण्याच्या मार्गाला लागण्याऐवजी जखम सडतच जाते. 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात सादर केलेला सिक्कीमसंदर्भातील लेख नेमक्या याच वस्तुस्थितीचे दर्शन घडवतो. आजचे आपले बहुतेक सारे प्रश्न याच पंथाने वाटचाल करताना दिसतात. आपापसांतील मानवी व्यवहारांना नीतिमत्तेचे आणि शुद्ध हेतूंचे काही किमान अधिष्ठान असले पाहिजे, ही जाणीवच दिवसेंदिवस क्षीण होताना दिसते. त्यामुळे, कोणीही कोणतीही भूमिका मांडली की तिच्या प्रामाणिकपणाबाबत निरपवाद खात्रीच कोणाला वाटत नाही. एकंदरच अविश्वासाचे इतके प्रगाढ वातावरण सर्वदूर पसरलेल्या समाजात त्यामुळे प्रगतीची वाटचाल अडखळत होणे स्वाभाविकच ठरते. प्रगतीचा वेग मंदावला की असंतोषाला आयतेच खतपाणी मिळते. निखळ प्रामाणिकपणावर विश्वास, काही किमान नीतिमूल्यांची लोकव्यवहारात जपणूक, अशा नीतिमत्तेला वाटाण्याच्या अक्षता लावणाऱ्यांना कठोर दंड आणि समाजव्यवहारातील प्रश्नांची तड लावण्यासाठी आवश्यक असणारा सुसंस्कृत संवाद या जीवनमूल्यांची प्रतिष्ठापना आपल्या रोजच्या जगण्यात प्रतिष्ठापूर्वक करणे, ही एकसष्टीत प्रवेश केलेल्या भारतीय प्रजासत्ताकाची आजची खरी निकड आहे. आपल्या समाजातील एकंदरच लोकजीवनव्यवहारांत विवेकाधिष्ठित प्रगल्भ चिंतनशीलतेचा आज जो संकोच होताना दिसतो, त्याचीच ही बव्हंशी निष्पत्ती होय, असे मानायचे का ? विवेकाचे अस्तर लाभलेली उक्ती आणि कृती ही लोकशाही शासनप्रणालीच्या अर्थपूर्ण नांदणुकीची पूर्वअटच ठरते. याच विवेकवादाचे जागरण या भूमीत घडावे यांसाठी गेल्या दोन शतकांतील समाजमनस्क व्यक्तींनी प्रयत्नांचे पहाड फोडले. आज गरज आहे ती त्या समाजपुरुषांच्या शिकवणुकीचे मंथन आदरपूर्वक घडवण्याची, त्यांचा वारसा सांगत असतानाच त्यांचा वसा पेलण्याच्या जबाबदारीचे भान पोटी बाळगण्याची. देशाचा स्वातंत्र्यदिन साजरा करत असताना ही एवढी आठवण आपण ठेवली तरी पुरे ! ■■

सामाजिक

# लढा सांस्कृतिक ठेवीच्या रक्षणासाठी....

हिमालयाचा वरदहस्त लाभलेल्या आणि नैसर्गिक वैविध्याने नटलेल्या भारताच्या ईशान्येकडील सिक्कीम प्रांताची शांतता अलीकडे एका लढ्याने भंग पावली आहे. तीस्ता (Teesta) नदीवर बांधण्यात येत असलेल्या धरणाच्या बांधकामाला स्थानिकांनी - लेपचा (Lepcha) नागरिकांनी - विरोध करून शांततापूर्ण मार्गाने लढा उभा केला आहे. या लढ्याचे वैशिष्ट्य म्हणजे हा लढा धरण बांधल्यामुळे होणा-या विस्थापितांच्या प्रश्नांची तड लागावी यासाठी नाही. कारण, मुळातच तेथील लोकवस्ती विरळ असल्याने विस्थापन ही तेथे समस्याच नाही. हा लढा आहे तो स्थानिक समूहांची धरणपरिसरातील धार्मिक-सांस्कृतिक ठेव जतन करण्यासाठी. शिवाय, धरणक्षेत्रांतील जैववैविध्य नष्ट होऊन पर्यावरणाची हानी होऊ नये, ही भावनाही यामागे आहेच.

सिक्कीममधील हा प्रश्न समजून घेताना सिक्कीमची भौगोलिक, सांस्कृतिक आणि राजकीय जडणघडण लक्षात घ्यावी लागते. पूर्व हिमालयाच्या पर्वतराजीतील या प्रांताच्या पश्चिमेला नेपाळ, पूर्वेला भूतान, उत्तरेला चीन हे देश तर दक्षिणेला भारतातील पश्चिम बंगाल राज्य आहे. सिक्कीमच्या उत्तर भागांत पर्वतरांगा आहेत आणि दक्षिणेचा भाग मैदानी आहे. तेथे जैववैविध्यही मोठ्या प्रमाणावर आढळते. सिक्कीममध्ये तीस्ता (Teesta) आणि रांगीत (Rangeet) या नद्या आहेत. तिबेटच्या पठारातील Chho Lhamu Lake येथे उगम असलेल्या तीस्ता नदीला अनेक उपनद्या मिळून तिचा प्रवाह मोठा बनतो. रांगीत ही नदी उगम पावते ती Rathong या बर्फाळ भागांत. सिक्कीम आणि बंगाल यांना जोडणा-या दरीनजीक रांगीत नदी तीस्ता नदीला मिळते. सिक्कीमच्या उत्तरेकडील भागात, तीस्ता नदीवर Dzongu भागात सिक्कीमच्या विकासासाठी धरणे बांधण्याच्या व ऊर्जानिर्मितीच्या योजना सरकारने आखल्या आहेत.



लेपचा हे सिक्कीममधील स्थानिक नागरिक आहेत. पश्चिम बंगाल, नेपाळ आणि भूतान येथेही लेपचा नागरिक वास्तव्य करून आहेत. सिक्कीममध्ये पूर्वी नाओंग, चँग आणि मॉन या जमातीं वास्तव्य करून होत्या. लेपचांचा प्रवेश तेथे कसा झाला याचे मूळ अद्याप गवसलेले नाही. पण नागा, गारो आणि खासिया या जमातींमध्ये त्यांचे मूळ असावे असा अंदाज व्यक्त करण्यात येतो. सिक्कीममध्ये सुमारे ५० हजार लेपचा राहतात. तर, सिक्कीमबाहेर राहणा-या लेपचांची संख्या सुमारे ७० हजार इतकी आहे. या सर्वांची भाषा एक, संस्कृती एक आणि परंपराही समान आहे. त्यांचा धर्म बौद्ध आहे. स्थानिक परिसरविज्ञानाची उत्तम जाण लेपचा नागरिकांना आहे. विशेषतः, त्यांचे वनस्पतीविषयक ज्ञान चांगले आहे. Mutanchi Rong Cup म्हणजे 'निसर्गमातेचे सुपुत्र' असे ते आपले वर्णन करतात. लेपचा नागरिक कांचनगंगा (Kanchernjunga - कांचनजंगा - असाही याचा उच्चार केला जातो) या पर्वताचे पूजक असून हा पर्वत त्यांच्या लेखी जणू मातेसमान आहे.

सिक्कीममध्ये राहणा-या लेपचा नागरिकांची लोकवस्ती विरळ आहे. धरणक्षेत्रात - Dzongu Lepcha Reserve भागात - वास्तव्य करणारे सुमारे सात हजार लेपचा नागरिक बौद्धधर्मीय आहेतच शिवाय त्यांच्यावर गूढवादाचाही प्रभाव आहे. शेती हा तेथील परंपरागत व्यवसाय असला तरी अनेक सुशिक्षित लेपचा नागरिक सरकारी नोक-यांकडेही वळले आहेत आणि आता ते Dzongu Lepcha Reserve या भागात वास्तव्यास नाहीत. कांचनगंगा राष्ट्रीय उद्यानाचा काही भाग Dzongu Lepcha Reserve भागात मोडतो. घनदाट जंगले, खळाळत्या नद्या आणि नाना त-हेच्या वनस्पतींनी बहरलेल्या या भूमीवर अनेक प्रकारचे पशुपक्षी आढळणे स्वाभाविकच होय. जैववैविध्याचा 'हॉटस्पॉट' असलेला हा भाग तसा एकदम शांतच होता. पण सिक्कीमच्या या भागाची शांतता भंग पावली ती स्थानिकांच्या धरणविरोधी आंदोलनामुळे. २००३-०४च्या सुमारास धरणांना विरोध करण्याची सुरुवात झाली होती. तेव्हापासून या संदर्भात काही ना काही घडत होते पण २००८मध्ये झालेल्या आंदोलनाने हा प्रश्न अधिक चर्चेत आला. या आंदोलनात लेपचा तरुणांचा सहभाग लक्षणीय होता.

Dzongu Lepcha Reserve भागातील धरणांना लेपचा नागरिकांचा विरोध आहे कारण ही भूमी लेपचा नागरिकांची सांस्कृतिक ठेव आहे. धरणे बांधल्याने त्यांची ही सांस्कृतिक ठेव नष्ट होण्याची शक्यता आहे. लेपचांसाठी ही ठेव - Mayel Lyang - म्हणजे जणू त्यांना लाभलेली स्वर्गभूमीच (Land of Hidden Paradise) होय. मृत्यूनंतर लेपचा नागरिकांच्या आत्म्यांना तेथे चिरविश्रांती मिळते, अशी त्यांची श्रद्धा आहे. शिवाय, त्यांच्या लोककथांमध्ये, साहित्यात आणि प्रार्थनांमध्ये या परिसराचे अमोल महत्त्व अधोरेखित केले गेले आहे. बौद्धधर्माच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या तीर्थयात्रेची अनेक स्थळे या परिसरात आहेत. धरणांमुळे या सा-याच नैसर्गिक, धार्मिक आणि सांस्कृतिक संचितावर गंडांतर येणार असल्याने धरणांना विरोध करण्याची लेपचा नागरिकांची भूमिका आहे. त्यांच्या दृष्टीने हा प्रश्न विकासाचा वा विस्थापितांचा नाही तर त्यांच्या लोकशाही हक्कांचा - सांस्कृतिक ठेव्याचे रक्षण करण्याचा - आहे.

येथे सिक्कीमची सामाजिक व राजकीय जडणघडण समजून घेतली पाहिजे. बौद्ध धर्माचा प्रसार सिक्कीममध्ये आठव्या शतकात झाला. तेव्हापासून आजपर्यंत सिक्कीममध्ये बौद्धधर्माचा प्रभाव राहिला आहे. १९७५साली सिक्कीमचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण घडून आले. तोवर सिक्कीमच्या व्यवस्थेत भूतिया राजघराण्याचे वेगळे असे स्थान होते. आपल्या प्रजेच्या हक्कांचे संरक्षण विलिनीकरणानंतरही केले जावे, अशी सिक्कीम नरेशांची इच्छा होती. लेपचा, भूतिया आणि सिक्कीममध्ये पूर्वापार स्थायिक झालेले नेपाळी नागरिक यांची गणना सिक्कीमचे राजे त्यांच्या 'आद्य प्रजे'मध्ये करीत असत. यातूनच, सिक्कीमी समाजव्यवस्थेत 'आतले' आणि 'बाहेर'चे या प्रकारची भावना ऐतिहासिक काळापासून वसत आलेली दिसते. 'सिक्कीमी' आणि 'बिगर सिक्कीमी' अशी शब्दयोजना त्यातूनच व्यवहारात रुढावलेली दिसते. त्याच अनुषंगाने, कररचना व करआकारणी, जमिनीचे हस्तांतरण व विक्री, सिक्कीमच्याच काही भूभागात प्रवेश करण्यासंदर्भातील मुभा, त्यासाठी परवाना, नेपाळचे नागरिकत्व स्वीकारण्यासंदर्भातील अनुमती...यांसारख्या बाबींत सिक्कीमी आणि बिगरसिक्कीमींसाठी निरनिराळ्या व्यवस्था व्यवहारात आढळून येतात.



आपल्या हक्कांच्या संदर्भात बोलताना 'सिक्कीम भूतिया अँड लेपचा असोसिएशन' (SIBLAC) भारतीय राज्यघटनेच्या 371 F या कलमाचा आधार घेते (महाराष्ट्र राज्य शासनाने प्रसिद्ध केलेल्या संविधानाच्या मराठी अनुवादात हे कलम '३७१च' असे आहे). या कलमानुसार सिक्कीमसाठी विशेष तरतुदी लागू करण्यात आल्या असून सिक्कीममधील स्थानिक नागरिकांच्या (लेपचा नागरिकांच्या भाषेत आतल्यांचे?) हक्कांचे व हिताचे रक्षण करण्याची विशेष जबाबदारी राज्यपालांवर सोपविण्यात आली आहे. काही सिक्कीमी नागरिकाची गणना अनुसूचित जमातींमध्ये केली जाते. आपल्याला primitive tribe status मिळावे अशी लेपचा नागरिकांची मागणी आहे. असे झाल्यास ते 'आद्य आतले' (first insider) बनतील आणि त्यांच्या जमिनीवरील त्यांच्या हक्कावर शिक्कामोर्तब होऊन त्यांच्या धार्मिक-सांस्कृतिक अधिकारांचे प्राधान्याने रक्षण होईल, असे त्यांना वाटते. वेगवेगळ्या आदिवासी जमातींना अदा करण्यात आलेल्या विशेष सवलती आणि प्रदान करण्यात आलेला दर्जा हे सिक्कीममधील जनरीतीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. हे वास्तव तेथील राजकीय व्यवस्था व प्रणालीतही डोकवते. आपल्या भूमिकेशी विसंगत सूर काढणा-या सिक्कीमबाहेरील समाजघटकांची बोळवण आतले आणि बाहेरचे या भावनेच्या आधारे करणे राज्यकर्त्यांना त्यामुळेच सोयीचे ठरते.

विशेषतः, पश्चिम बंगालमधील लेपचा नागरिक एप्रिल २००८मध्ये Dzongu Lepcha Reserve भागात आले होते तेव्हा सत्तारूढ पक्षाने ही पार्श्वभूमी लक्षात घेतली असे म्हटले गेले. सरकारने बाहेरच्यांविरुद्ध अशी भूमिका घेण्यामागे लेपचा नागरिकांचा धरणविरोध हेदेखील एक महत्त्वाचे कारण आहे, असे म्हटले जाते. सिक्कीमबाहेरील या नागरिकांच्या धार्मिक यात्रेचे व्यवस्थापन कालिंपोंग भागातील लेपचांच्या स्थानिक संस्थेने केले होते. खरे तर धार्मिक यात्रेच्या निमित्ताने सिक्कीमबाहेरील लेपचा नागरिकांना धरणविरोधी आंदोलनात सहभागी होण्याची संधी मिळणार होती. ती संधी त्यांनाही पदरात पाडायची होती. कारण, आपल्या सांस्कृतिक ठेवीचे रक्षण आपण केले पाहिजे, ही भावना त्यांच्या मनांत निर्माण झाली होती. तसेच, दुसरीकडे स्थानिकांनाही त्यांचा पाठिंबा मिळवायचा होता.

लेपचांच्या स्थानिक संस्थेने 'अफेक्टेड सिटिझन्स ऑफ तीस्ता' (ACT) या धरणविरोधी गटाला पाठिंबा दिला होता. धरणविरोधी आंदोलन चालू झाल्यानंतर निदर्शने, साखळी उपोषण आणि राष्ट्रीय महामार्ग बंद करणे या सर्व घटनांमध्ये स्थानिक लेपचांचा सहभाग राहिला होता. त्यामुळे लेपचांची स्थानिक संस्था/संघटना सरकारच्या लेखी अप्रिय बनलीच होती. सिक्कीममध्ये पूर्वीपासूनच Dzongu Lepcha Reserve या भागात यात्रा करण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडून परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे यात्रा करण्याची परवानगी देण्याचे वेगवेगळे मार्ग सत्तारूढ पक्षाने अवलंबिले. काहींना परवानगी नाकारली, कधी पाच जणांच्या गटाला परवानगी दिली, तर कधी पवित्र स्थळी फक्त ठरावीक काळच थांबण्याची परवानगी दिली. एकप्रकारे बाहेरच्यांबद्दल नाराजी व्यक्त करण्याचा हा मार्ग होता असे म्हटले जाते. दरम्यान, बाहेरून आलेले लेपचा नागरिक धरणविरोधी स्थानिकांना मदत करीत असल्याचे सिक्कीम सरकारला समजल्याबरोबर त्यांनी पश्चिम बंगालमधील लेपचा नागरिक बाहेरचे असल्याने त्यांच्यावर दोषारोपण करण्याचा मार्ग अवलंबिला. या बाहेरच्या नागरिकांनी लौकरात लौकर सिक्कीम सोडून जावे असे वातावरण सरकारने तयार केले. स्थानिक गटांत दुरावा निर्माण करण्याचे प्रयत्न बाहेरचे करतात, असेही सत्तारूढ पक्षाकडून या यात्रेदरम्यान म्हटले जाऊन त्यांच्या विरोधात वातावरण निर्माण केले गेले. सरकारच्या अशा भूमिकेमुळे त्यांना यात्रा सोडून देणे भाग पडले.

दरम्यान, सिक्कीममधील घडामोडी दिल्लीपर्यंत पोहचल्या आणि सिक्कीममधील शांतात भंग पावली आहे, हे केंद्र सरकारच्या ध्यानात आले. या प्रश्नात (सिक्कीमसाठी बाहेरच्या असणा-या आणि) नर्मदा धरण विरोधी आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांनीही लक्ष घातले होते. पश्चिम बंगालमधील लेपचांनीच मेधा पाटकर यांच्या सिक्कीमच्या भेटीचे नियोजन केले होते. सिक्कीमसाठी त्या बाहेरच्या होत्या पण विरोधी पक्षातील नेत्यांनी व माध्यमांनी या भेटीची दखल घेतली. या घडामोडी घडत असतानाच्या काळात धरणांच्या बांधकामाला विरोध करावा किंवा कसे या मुद्यावरून स्थानिक लेपचांमध्ये दोन गट तयार झाले होतेच.



आर्थिक मदतीसाठी सिक्कीम राज्य केंद्र सरकारवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. सिक्कीमचे हे अवलंबन एका गटाला खटकते. सिक्कीम स्वयंनिर्भर होणे हे त्यांना महत्त्वाचे वाटते. ही भावना राज्य सरकार जाणते. त्यामुळे धरणे बांधल्याने सिक्कीमचा आर्थिक विकास घडून येईल व सिक्कीम स्वयंनिर्भर बनू शकेल असे राज्य सरकारतर्फे सांगण्यात येते. ही बाब या गटाला मान्य होते. त्यामुळे धरणांच्या बाजूने हा गट उभा राहतो. स्वाभाविकच धरणविरोधी आंदोलनकर्त्यांची भूमिका त्यांना मागास वाटते. धरणांना विरोध करणे म्हणजे विकासाला विरोध करणे असे या गटाला वाटते. या शिवाय अनेक सुशिक्षित लेपचा नागरिक राज्य सरकारच्या सेवेत आहेत. ते उघडपणे राज्यसरकारच्या विरोधात जाऊ शकत नाहीत.

धरणविरोधी आंदोलनकर्त्यांचे म्हणणे सत्तारूढ पक्षाने ऐकून न ऐकल्यासारखे केले आहे, असे दिसते. Dzongu Lepcha Reserve या भागाचे पावित्र्य कायम राखण्यात येईल, असे सत्तारूढ पक्षातर्फे सांगण्यात येते. त्याच वेळी लेपचा नागरिक राज्यातील शांतता बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत, असेही सत्तारूढ पक्ष म्हणतो. दरम्यान, स्थानिकांच्या भावना लक्षात घेऊन Dzongu Lepcha Reserve या भागातील सहापैकी चार प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पण कांचनगंगा राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात हे प्रकल्प येत असल्याने ते राज्यसरकारला रद्द करावे लागले, हे खरे कारण या निर्णयामागे असल्याचे काहींचे मत आहे. दरम्यान, आंदोलक आणि सत्तारूढ पक्ष या दोघांनी याबाबत तोडगा काढण्यासाठी चर्चा करण्याचे ठरविले. म्हणून लेपचा नागरिकांनी आपले साखळी उपोषण मागे घेतले. चर्चेदरम्यान, लेपचा नागरिकांच्या मागण्या मान्य करू असे म्हणतानाच सरकारने आपण विकासाचा मार्गही सोडणार नाही, असे स्पष्ट केले. तसेच, सिक्कीमच्या उत्तर भागात बौद्ध मठ स्थापन करण्याचे आश्वासन सत्तारूढ पक्षाने दिले. पण अद्याप त्याबाबत कोणतीही कृती झालेली नाही. सांस्कृतिक ठेव जतन करण्यासाठीच्या लेपचा नागरिकांच्या लढ्याची कहाणी या वर्षी या टप्प्यावर येऊन पोहचली आहे. पुढे काय घडते ते आता पाहायचे. ■■

शिक्षण

# चर्चा तांत्रिक शिक्षणातील सुधारणांची

शिक्षणातील सुधारणा हा भारतात तरी कायम चर्चेत असलेला विषय असल्याचे दिसते. बालशिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यंत सर्व ठिकाणी काही ना काही चांगले बदल व्हावेत, असाच साधारणतः सर्व चर्चांचा सूर असतो. विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान या विषयांतील शैक्षणिक सुधारणांबाबतच्या चर्चांमध्येही अनेक प्रकारची मते मांडण्यात येतात. या विषयांत शिक्षण घेतलेले भारतीय विद्यार्थी परदेशांत - विशेषतः अमेरिकेत - चांगली कामगिरी बजावतात, याचा अर्थ भारतातील या विषयांचे शिक्षण उपयुक्त व चांगले आहे, असा एक मतप्रवाह आहे. या विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यात भारतीय उद्योगक्षेत्र मागे पडल्याचेही मत पुढे येते. तर, तांत्रिक शिक्षण घेतलेल्या सर्वसामान्य भारतीय विद्यार्थ्यांच्या ज्ञान व आकलनाच्या दर्जाबद्दल शंका उपस्थित करणारा दुसरा मतप्रवाह आहे. यांतील अनेक विद्यार्थी पदवीनंतर व्यवस्थापनाच्या शिक्षणाला प्राधान्य देतात. विद्यार्थ्यांचा हा कल बाजारपेठेत उपलब्ध होणा-या नोक-यांच्या संधींशी संबंधित असल्याचे मत पुढे येते. या चर्चांमध्ये अलीकडे काही अभ्यासकांनी आणखी भर घातली आहे. विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान या विषयांसंबंधीचा ऊहापोह करताना या संदर्भातील बदल घडवून आणण्यासाठीचे काही मार्ग त्यांनी सुचविले आहेत. या मार्गांचा अवलंब केल्यास भारतीय उद्योगाला व पर्यायाने अर्थव्यवस्थेलाही त्याचा फायदा होऊ शकेल, असे त्यांना वाटते.

या संदर्भात भारताला परदेशांकडून बरेच काही शिकता येईल. जगभरातील हुषार आणि कल्पक तरुणांना शिकण्याच्या तसेच या ज्ञानाचा व कौशल्यांचा उपयोग उद्योगक्षेत्रात करण्याच्या संधी त्यांना अमेरिकी विद्यापीठांनी उपलब्ध करून दिल्या. याद्वारे एक प्रकारे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे काम करून अमेरिकेतील विद्यापीठांनी विद्यापीठीय शिक्षणाचे एक चांगले 'मॉडेल' उभे केले आहे, असे म्हटले जाते. भारतालाही या 'मॉडेल'चा अंगिकार करता येईल.



अलीकडे, चीनमध्येही अमेरिकी विद्यापीठीय शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले जात आहे, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. अमेरिकेतील विद्यापीठांप्रमाणे भारतातील विद्यापीठांनाही काही गोष्टी करणे शक्य आहे. संशोधित नवीन उत्पादने बाजारपेठेत आणण्याच्या उद्दिष्टाने विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला भरा-या घेण्यासाठी भारतातील विद्यापीठांनी मोकळे अवकाश उपलब्ध करून दिले पाहिजे, तसे शिक्षण-प्रशिक्षण देण्यासाठी विद्यापीठांनी आवश्यक तो पुढाकार घेतला पाहिजे. भारतात techno-entrepreneurs घडण्यासाठी innovative spirit ची गरज आहे. नवीन उत्पादने, उत्पादनांत सतत सुधारणा आणि वाजवी दर हे सत्र सतत सुरू राहिले तर ग्राहक, बाजारपेठ आणि अर्थव्यवस्था या सर्वांसाठी ते उपयुक्त ठरू शकेल. स्पर्धेत टिकण्याच्या दृष्टीने (सव्हार्यव्हल ऑफ द फिटेस्ट) ती एक सतत चालणारी प्रक्रिया असेल. या प्रक्रियेला Darwinian capitalism असेही म्हणता येईल. अमेरिकेने हेच केले आहे.

अमेरिकेतील खाजगी विद्यापीठे ही विद्यार्थ्यांसाठी संशोधनकेंद्रे ठरली. तसेच ती एक प्रकारे 'कॉर्पोरेशन्स'ही बनली. आणि त्यांनी विद्यार्थ्यांना अतिशय मोलाची सेवा दिली. त्यांच्या दृष्टीने विद्यार्थी हे 'ग्राहक' असल्याने या विद्यार्थी-ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याला विद्यापीठांनी प्राधान्य दिले. अभ्यासक्रमात बदल केले. संशोधनकार्यात काम करण्याची संधी त्यांना मिळावी यासाठी प्रयत्न केले. अलीकडच्या काळात भारत सरकारने पर्यावरणीय अभियांत्रिकी, सौरऊर्जा, संरक्षण व लष्करविषयक तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, नॅनोटेक्नॉलॉजी इत्यादी विषयांसाठी संशोधनकेंद्रे स्थापन करण्याचे धोरण आखले आहे. ही चांगली बाब असली तरी या संशोधनकेंद्रांमध्ये विविध विषयांतील तज्ज्ञ व्यक्तींच्या नेमणुका कराव्या लागतील. यासाठी भारत सरकारने परदेशस्थ भारतीय संशोधकांशी संपर्क साधला, पण त्याला संमिश्र प्रतिसाद मिळाला. संशोधन करण्यास पूरक असे वातावरण व सोयी, संशोधनांसाठी पुरेसा निधी आणि संशोधनाला साहाय्य करू शकणारे मनुष्यबळ अशा पूरक बाबींचा अभाव त्यांना जाणवत असल्याने परदेशांतील 'करियर' सोडून भारतात परतण्याबाबत त्यांच्यात संभ्रमाची स्थिती निर्माण झाली.

स्थानिक उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन त्यानुसार अमेरिकेतील विद्यापीठांनी काही अभ्यासक्रम चालू केले. अमेरिकेत 'स्मॉल बिझिनेस इनोव्हेशन रीसर्च' निधी उपलब्ध करून देण्यात येतो. त्यामुळे संशोधन कार्य पुढे गेले आणि रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या. भारतातही असे काही करता येईल का, याचा विचार करता येईल. अलीकडे भारतात उद्योगक्षेत्र, तज्ज्ञ आणि सरकार यांच्या एकत्रित प्रयत्नांमधून संशोधनकार्याचा विचार होऊ लागला आहे, ही एक चांगली घटना होय. काही विद्यापीठांमधील अभ्यासक्रमाबाबत नव्याने विचार केला पाहिजे, असेही मत मांडण्यात आले आहे. उदाहरणार्थ, मुंबई येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी' येथे कापडउद्योगाशी संबंधित रंगनिर्मितीचे तंत्रज्ञान या विषयासाठी असलेला पदविका अभ्यासक्रम आहे. स्थानिक उद्योगांची गरज लक्षात घेऊन तो पदवी अभ्यासक्रम करता येईल. या शिवाय, अन्य काही विषय शिकविताना प्रत्यक्ष उदाहरण त्यांच्यापुढे ठेवता आले तर ते उपयुक्त ठरेल.

अमेरिकेतील विद्यापीठांमधील एक उल्लेखनीय बाब म्हणजे तेथे प्राध्यापकांसाठी निवृत्तीचे वय नाही. भारताने या बाबीचा गंभीरपणे विचार करायला हवा. भारतातील सर्व राज्यांमधील महाविद्यालयांसाठी याबाबत समान नियम करून प्राध्यापकांना अधिक काळ शिकविण्याची संधी देता येईल. असे केल्याने तरुणांना संधी मिळणार नाही असा आक्षेप सर्वप्रथम उपस्थित केला जातो/जाईल. पण अमेरिकेत असे घडलेले नाही आणि निवृत्तीचे वय नसल्याने काही प्राध्यापक अन्य कामे वा छंद यांसाठी लवकर निवृत्ती स्वीकारतात असे दिसून आले आहे. ज्या संस्थांमध्ये ज्या विषयांतील प्राध्यापकांच्या जागा रिक्त असतील त्या विषयांच्या संदर्भात हा उपाय योग्य ठरू शकेल. कारण, शिकविण्याची आवड असलेली व्यक्तीच असे काम मनापासून करण्यास उत्सुक असते. त्यामुळे प्राध्यापकांच्या नोकऱ्यांच्या संदर्भात निवृत्तीचे वय वाढविणे हा एक उचित उपाय ठरू शकेल. अर्थात या सुविधेचा गैरवापर होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. भारतात काही खाजगी तंत्रनिकेतन संस्थांमध्ये अध्यापकांचे निवृत्तीचे वय ७० वर्षे इतके आहे तसेच आयआयटी व अन्य काही विज्ञानसंस्थांमध्ये अध्यापकांसाठी निवृत्तीचे वय ६५ वर्षे इतके आहे.



भारतातील उद्योगक्षेत्रालादेखील या संदर्भात काही ठिकाणी पुढाकार घेता येईल, असे तज्ज्ञांना वाटते. या ठिकाणी सरकारची भूमिकाही महत्त्वाची ठरेल. संशोधनाला साहाय्य करणाऱ्या संस्थांना करात सवलत देता येईल. महाविद्यालयीन तरुणांना कामाचा अनुभव देण्यास तयार असलेल्या कंपन्यांनाही करात सवलती देता येतील. अध्यापकांना साहाय्य करणाऱ्या उद्योगांनाही करसवलत देण्याचा विचार करता येईल. शैक्षणिक संस्था आणि उद्योगक्षेत्र यांच्या समन्वयाने काही अभ्यासक्रम राबविण्याचाही विचार व्हायला हवा. उदाहरणार्थ, दर सहा महिन्यांनंतर काही काळ उद्योगक्षेत्रात काम करून कामाचा अनुभव घेण्याचा अभ्यासक्रम तयार करता येईल. भारतात काही शैक्षणिक संस्थांमध्ये असा अभ्यासक्रम चालू करण्यात आला आहे. त्याची व्याप्ती वाढावयास हवी. उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सरकार यांच्यात अशा चर्चा सतत होत राहिल्यास या संबंधीचे आणखी मुद्दे स्पष्ट होत जातील, असे मत तज्ज्ञ मांडतात.

'सिलिकॉन व्हॅली' या नावाने विख्यात असणाऱ्या अमेरिकेतील कॅलिफोर्निया भागात विद्यापीठांमधील संशोधन आणि त्याद्वारे घडलेला उद्योजकता विकास हा अमेरिकेतील अर्थव्यवस्थेसाठी मोलाचा ठरला आहे, हे येथे उल्लेखनीय ठरते. अलीकडे भारतातही सरकार, शैक्षणिक संस्था आणि उद्योगक्षेत्र यांच्या सहकार्यातून New Millennium Indian Technological Leadership Initiative (NMITLI) ही कल्पना मांडण्यात आली असून ती स्वागतार्हच आहे असे तज्ज्ञांनी म्हटले आहे. तांत्रिक शिक्षणाच्या संदर्भातील अमेरिकेतील काही निवडक 'मॉडेल्स'चा स्वीकार भारताने विचारपूर्वक केला तर ते उपयुक्त ठरेल.

भारतातील विज्ञान व तांत्रिक शिक्षणात अशा काही प्रकारच्या सुधारणा होत गेल्यास भारताचे शैक्षणिक, औद्योगिक, आर्थिक व सामाजिक आरोग्य सुदृढ बनू शकेल आणि भारत विकासाच्या पंथावर अधिक वेगाने वाटचाल करू शकेल. धोरणकर्ते, प्राध्यापक-संशोधक, उद्योजक तसेच अन्य संबंधित अधिकारी यांच्यात विविध मुद्यांवर सर्वकष चर्चा होऊन त्यानुसार सुयोग्य कृती झाल्यास भविष्यात संशोधनक्षेत्रात व तांत्रिक शिक्षणात चांगले बदल घडून येतील अशी आशा बाळगता येईल. ■■

राजकीय

# स्पर्धा शस्त्रास्त्रांची

लाखो वर्षांपूर्वी दगडाची हत्यारे वापरणा-या माणसाचा प्रवास काळाच्या ओघात अणुबाँबपर्यंत झाला आणि ६ ऑगस्ट १९४५ रोजी जगात भीषण नरसंहार घडला. जग तर हादरलेच आणि उभ्या मानवजातीने हतबलताही अनुभवली. अमेरिकेने जपानवर अणुबाँब टाकण्याच्या दुर्घटनेला या वर्षी ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत. शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेसंदर्भात अमेरिका व तत्कालीन सोव्हिएत रशिया यांच्यात तेव्हापासून काय काय घडले याचा आढावा घेतला तर काय आढळते?

लष्करावर होणा-या खर्चाचा मुद्दा येथे प्रथम समोर येतो. दुस-या महायुद्धाच्या काळात तत्कालीन सोव्हिएत रशिया आणि ब्रिटनकडून एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या (national product) सुमारे ६० टक्के खर्च शस्त्रास्त्रे व अन्य लष्करविषयक बाबींवर केला जात होता. अमेरिकेतील हेच प्रमाण सुमारे ३० ते ४० टक्के इतके होते. १९४५नंतर मात्र अमेरिकेचा हा खर्च १४ टक्क्यांपेक्षा अधिक कधी झाला नाही. सोव्हिएत रशियाचाही हा खर्च २० टक्यांच्या परिघात राहिला. मात्र, शांततेच्या काळातील खर्चाचा विचार करता हा कमी केलेला खर्चदेखील जास्तच होता. दरम्यान, अण्वस्त्रांची निर्मिती चालू झालेली होती. विज्ञानविषयक संशोधन पुढे जात होते आणि नवतंत्रज्ञानाच्या मदतीने शस्त्रास्त्रे आधुनिकतेकडे वाटचाल करू लागली होती. आणखी एक युद्ध झाले तर मानवजातीसमोर केवढे मोठे संकट उभे ठाकेल, याची कल्पना त्याच वेळी जगाला आलेली होती. तरीदेखील शस्त्रास्त्रस्पर्धा चालूच होती. तत्कालीन सोव्हिएत रशियाने अणुबाँबचे तंत्रज्ञान अवगत केले आणि अणुबाँब निर्मितीसंबंधीचा अमेरिकेचा वरचष्मा संपुष्टात आला. शस्त्रास्त्रस्पर्धेत सोव्हिएत रशियापेक्षा अमेरिका एक पाऊल पुढेच पाहिजे, या विचाराने प्रेरित झालेल्या अमेरिकी नेतृत्वाने अणुबाँबपेक्षा शक्तिशाली अशा हायड्रोजन बाँबच्या निर्मितीचा आणि अण्वस्त्रांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला होता.



या नंतर कोरिया युद्ध झाले आणि अमेरिकी धोरणात काही बदल घडून आले. आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने लष्करावरील खर्चात अमेरिकेने मोठी वाढ केली. या काळात जगाच्या अन्य भागांतील घडामोडींकडे व विशेषतः युरोपीय देशांकडे अमेरिकेचे विशेष लक्ष होते. अमेरिकेच्या लष्करी तळांची संख्या वाढविण्याचा निर्णय या काळात घेण्यात आला, तसेच, अन्य देशांबरोबर लष्करविषयक करारही करण्यात आले. सुरक्षेच्या संदर्भात ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या देशांनी अमेरिकेच्या बाजूने कल दर्शविला. प्रशांत महासागरासाठी विशेष सुरक्षा यंत्रणा असावी, हा मुद्दा ऑस्ट्रेलियाने लावून धरला. जपान, फिलिपिन्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि इंडोनेशिया या देशांबरोबर करार करण्याची तयारी अमेरिकेने दर्शविली. मात्र, चीन व थायलंड यांच्याबरोबर करार करण्याबाबत अमेरिकेने पावले उचलली नाहीत. अमेरिका आणि सोव्हिएत रशियातील लष्करविषयक घडामोडी पाहून युरोपीय देशही या स्पर्धेत उतरले होते. लिस्बन येथे १९५२मध्ये झालेल्या 'नाटो'च्या (NATO-North Atlantic Treaty Organisation) परिषदेत युरोपीय देशांनी काही महत्त्वाचे निर्णय घेतले. युरोपीय देशांच्या संरक्षणव्यवस्थेत जर्मनीला सहभागी करून घेण्यात आले. निव्वळ कराराच्या (Treaty) स्वरुपातच तेथवर अस्तित्वात असलेल्या 'नाटो'चे रुपांतर याच काळात संघटनेमध्ये (Organisation) घडून आले. पश्चिम युरोपीय देशांनी अमेरिकेबरोबरचे सहकार्य वाढविले. १९५०नंतर ब्रिटन, फ्रान्स, चीन, भारत, आणि पाकिस्तान या देशांनी अण्वस्त्रसज्जतेकडे होण्याच्या दिशेने पावले टाकली होती.

जगातील शस्त्रास्त्रस्पर्धेत हळूहळू वाढ होऊ लागली तरी सोव्हिएत रशिया आणि अमेरिका या दोन महाशक्तींचा विचार करता अण्वस्त्रे व एकूण लष्करविषयक सामर्थ्य यांत सुरुवातीच्या काळात अमेरिकेचीच आघाडी होती. पण सोव्हिएत रशियाचे सामर्थ्यही वाढत होते. १९५५मध्ये चालू झालेल्या व्हिएतनामयुद्धामुळे १९६० ते ७० या काळात अमेरिकेचा लष्करविषयक खर्च वाढताच राहिला. अमेरिका व सोव्हिएत रशिया यांच्या जवळील शस्त्रास्त्रांच्या संख्येवर नियंत्रण आले ते १९७२मध्ये झालेल्या Strategic Arms Limitation Treaty (SALT-1) या करारामुळे.

या करारचे दोन भाग होते anti-ballistic missiles (ABM) हा होता पहिला भाग. त्यानुसार, अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोघांनाही फक्त दोनच क्षेपणास्त्रे तयार ठेवता येणार होती. या कराराला कालमर्यादा नव्हती. कराराचा दुसरा भाग हा weapon launchers ची संख्या मर्यादित ठेवण्यावर होता व हा करार पाच वर्षांसाठी करण्यात आला होता. या नंतर SALT-2 असाही करार झाला होता. सोव्हिएत रशियाने १९७०मध्ये तत्कालीन पश्चिम जर्मनीबरोबरही करार केला होता. हा करार 'मॉस्को करार' म्हणून ओळखला जातो. युरोपीय देशांच्या सीमांच्या प्रश्नावरून युद्धे होऊ नयेत, या दृष्टीने हा करार करण्यात आला होता.

अमेरिका आणि सोव्हिएत रशिया यांच्यातील शस्त्रास्त्रस्पर्धा कमी होण्याच्या दिशेने दोन्ही देशांनी पावले उचलली आणि १९८५मध्ये उभय देशांमध्ये पुन्हा चर्चेच्या फे-या झाल्या. शीतयुद्धाच्या समाप्तीमुळे निःशस्त्रीकरणाला गती मिळाली. चर्चेच्या अनेक फे-यांनंतर जुलै १९९१मध्ये उभय देशांमध्ये START 1 असा करार करण्यात आला. डिसेंबर १९९१मध्ये तत्कालीन सोव्हिएत रशियाचे विघटन झाले तेव्हा सोव्हिएत रशियातील सुमारे एक तृतीयांश अण्वस्त्रांच्या उत्पादनाचा/साठवणूकीचा भाग हा नव्याने स्वतंत्र झालेल्या बेलारूस, युक्रेन आणि कझाकस्तान या देशांमध्ये होता. त्यामुळे, एका प्रकारे हे नवस्वतंत्र देश अण्वस्त्रसज्ज बनले. १९९२मध्ये लिस्बन येथे झालेल्या कराराच्या वेळी या देशांनी आपल्या भूमीवरून अण्वस्त्रे हटविण्याचे मान्य केले. काही शस्त्रास्त्रे नष्ट करण्याचे तर काही रशियाकडे सोपविण्याचे या वेळी ठरविण्यात आले. रशिया आणि युक्रेन यांच्यात असलेले काही राजकीय प्रश्न बाजूला ठेवून या संदर्भातील अंमलबजावणी करण्यात आली. १९९३मध्ये रशिया आणि अमेरिका यांच्यात START 2 असा करार झाला. त्या नुसार, पुढील दहा वर्षांत दोन्ही देशांनी प्रत्येकी तीन ते साडेतीन हजार अण्वस्त्रे नष्ट करण्याचे मान्य करण्यात आले. काही विशिष्ट अण्वस्त्रे संपूर्णपणे नष्ट करण्यात आली. अशी शस्त्रास्त्रे नष्ट करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व प्रकारची मदत रशियाला पुरविण्याचे आश्वासन अमेरिकेने दिले. शस्त्रास्त्रस्पर्धेचा विचार करता START 1 व START 2 हे दोन महत्त्वाचे करार ठरले.



दोन महासत्तांमधील शीतयुद्ध संपल्यानंतर अनेक देशांनी संरक्षणविषयक खर्चात कपात केली. अमेरिकेनेदेखील खर्चात कपात केली. १९९०मध्ये अमेरिकेचा संरक्षणविषयक खर्च ३००अब्ज अमेरिकी डॉलर इतका होता तो १९९५मध्ये सुमारे २६०अब्ज अमेरिकी डॉलर इतका कमी करण्यात आला. तरीदेखील शस्त्रास्त्रांवर सर्वांत अधिक खर्च करण्यात अमेरिकाच आघाडीवर होती आणि अमेरिकेत नवीन शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यात येत होतीच. अमेरिकेबरोबर अशी स्पर्धा करण्यात रशियालादेखील रस होता. पण विघटनानंतर आर्थिक प्रश्नांमध्ये अडकलेल्या रशियाला नवीन शस्त्रनिर्मितीसाठी आर्थिक तरतूद करणे शक्य झाले नाही.

शस्त्रास्त्रस्पर्धा कमी करण्याचा एक भाग म्हणून भूसुरुंगांवर बंदी आणण्याचा करार १२० देशांनी मंजूर केला. पण अमेरिका, रशिया आणि चीन यांनी त्यावर सही केली नाही. विकसनशील राष्ट्रांमधील संघर्षप्रवण क्षेत्रांमध्ये भूसुरुंगाचा वापर केला जात असल्याने त्यांच्यासाठी हा करार महत्त्वाचा ठरतो. शस्त्रास्त्रस्पर्धा कमी करण्याच्या दिशेने अशी काही पावले उचलली जात असतानाच मध्यपूर्व आणि पूर्व आशियातील देशांमध्ये तसेच बाल्कन भागात मात्र शस्त्रास्त्रस्पर्धा चालू होती.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात क्लिंटन प्रशासनाने अमेरिकेच्या संरक्षणविषयक खर्चात वाढ केली होती. त्यावर थोडीफार टीकाही झाली. २००१मध्ये जॉर्ज बुश यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली आणि ११ सप्टेंबर २००१ची घटना घडली. या नंतर अमेरिकेच्या लष्करविषयक खर्चात पुन्हा वाढ झाली. आजघडीला जगातील सर्व राष्ट्रांचा संरक्षणावरील एकत्रित खर्च जेवढा असेल तेवढा खर्च एकटी अमेरिका आपल्या संरक्षणावर करीत असेल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. जगाच्या कोणत्याही भागात काही घडले तर तेथे हस्तक्षेप करण्यास अमेरिका सक्षम असावी, या मूळ उद्दिष्टाने अमेरिकेने शस्त्रास्त्रांवरील खर्च वाढविला असावा असा तज्ज्ञांचा कयास आहे. अमेरिकेवर हल्ला झाला नाही तरी अमेरिका दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात वा अन्य कारणांसाठी सर्वप्रथम हल्ला करण्यास मागेपुढे पाहणार नाही, अशी आता अमेरिकेची भूमिका आहे. या भूमिकेबाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर बरीच टीकाही झाली आहे. *(पृष्ठ ३० वर पाहावे)*

जिकडेतिकडे

# आभासी राष्ट्र 'फेसबुक'चे

'सोशल नेटवर्किंग'साठी प्रसिद्ध असलेले 'फेसबुक' हे एक 'राष्ट्र' असते तर लोकसंख्येच्या दृष्टीने ते जगातील तिस-या क्रमांकाचे मोठे राष्ट्र ठरले असते ! आणि या संकेतस्थळाचे संस्थापक Mark Zuckerberg हे त्याचे अध्यक्ष बनले असते ! २१ जुलै २०१०रोजी 'फेसबुक'चे ५०कोटी सदस्य असल्याचे Zuckerberg यांनी अलीकडेच म्हटले आहे. येत्या काही वर्षांतच ही संख्या एक अब्जावर पोहचेल असा Zuckerberg यांचा विश्वास आहे. 'फेसबुक' हे राष्ट्र नाही आणि 'फेसबुक'ला 'राष्ट्र' म्हणताही येत नाही. कारण 'फेसबुक'ला स्वतःचे असे भौगोलिक स्थान नाही, तेथे कायदेव्यवस्था नाही, राष्ट्राला बांधणारे सांस्कृतिकप्रवाह नाहीत, नागरिकत्वाचा प्रश्न तेथे नाही, 'फेसबुक'चे सदस्यत्व कोणालाही घेता येते, या सदस्यांना कोणालाही निवडून द्यायचे नसते. तरीदेखील 'फेसबुक'च्या कार्यपद्धतीमुळे राष्ट्र-राज्य संकल्पनेसंदर्भात त्या बाबतची चर्चा होत आहे.

देशोदेशींच्या नागरिकांना एकत्र येण्यासाठी 'फेसबुक' ही एक उपयुक्त सुविधा ठरते. राष्ट्र-राज्य संकल्पनेची व्याख्या करताना Benedict Anderson यांनी imagined communities असा शब्दप्रयोग योजिला होता. आपण एका समान बंधाने अन्य नागरिकांबरोबर जोडले गेलो आहोत, असे imagined communitiesमधील नागरिकांना वाटते. नवमाध्यमांद्वारेही असे घडू शकते. त्यामुळे या काळात अशा 'ऑनलाइन कम्युनिटीज्' आढळणे स्वाभाविक होय, असे जाणकारांनी म्हटले आहे. 'ऑनलाइन कम्युनिटीज्'ची वाढती संख्या हे 'फेसबुक'चे यश असले तरी यामुळे आभासी आणि वास्तव जग यांतील सीमारेषा धूसर बनू लागली आहे का, हा प्रश्न येथे महत्त्वाचा ठरतो. 'फेसबुक'चा उपयोग करणा-यांच्या मते 'फेसबुक'चे साधर्म्य उदारमतवादी राजकीय प्रणालीशी आहे, असे म्हणता येईल. येथे नागरिकांना मोकळेपणाने मते मांडता येतात तसेच एखाद्या मुद्याबाबत अनुकूल वा प्रतिकूल भूमिका व्यक्त करता येते.



एखादे राष्ट्र जसे नागरिकांना विविध विषयांवर मते मांडण्याची संधी देते, त्याप्रमाणे 'फेसबुक'ही आपल्या सदस्यांची मते ऐकून घेत आहे. 'फेसबुक'चा वापर वाढल्याने अशा काही मुद्यांचा ऊहापोह करण्यात येत आहे. उदाहरणार्थ, एखाद्या राष्ट्राचा कारभार जसा काही व्यवस्थांमध्ये बद्ध होऊ न राष्ट्राची वाटचाल होते त्याप्रमाणे 'फेसबुक'संदर्भात काही व्यवस्था असाव्यात, असे मत अलीकडे मांडले जाऊ लागले आहे. आपल्या सदस्यांसाठी अलीकडे 'फेसबुक'ने काही योजना पुढे आणल्या आहेत. 'फेसबुक'वरील विविध सुविधांचा वापर करणा-यांनी आभासी चलन (virtual currency) म्हणजे 'फेसबुक क्रेडिट' मान्य करावे म्हणजे त्यांना विविध चलनांचा वापर करावा लागणार नाही, अशी एक योजना होती. पण 'फेसबुक'ने प्रत्येक व्यवहाराच्या वेळी त्यावर ३० टक्के कमिशन घेतल्याने त्यावर मोठी टीका झाली. असे असले तरी Zuckerberg यांचे जगातील संपर्क वाढविण्याबाबतचे स्वप्न साकारले आहे. Marshall McLuhan यांनी 'ग्लोबल व्हिलेज'ची संकल्पना मांडली होती. या संकल्पनेच्या निकट जाण्यासाठी 'फेसबुक' उपयुक्त ठरताना दिसते आहे. ■■

---

*(पृष्ठ २८वरून)*

शस्त्रास्त्रस्पर्धेच्या संदर्भात २००२मध्ये आणखी एक उल्लेखनीय घटना घडली. अमेरिका आणि रशिया यांनी SORT (Strategic Offensive Reduction Treaty) असा एक नवीन करार केला. त्यामुळे START 2 ची अंमलबजावणी आता करण्यात येणार नाही. SORT करारानुसार उपयोगात आणण्यासाठी सज्ज असलेली १७०० ते २२०० क्षेपणास्त्रे उभय देशांनी २०१२पर्यंत कमी करायची आहेत. अमेरिका व रशियादरम्यान अशा घडामोडी चालू असतानाच चालू शतकात लिबिया, इराण आणि उत्तर कोरियाही अण्वस्त्रांच्या स्पर्धेत उतरले असल्याचे चित्र आहे. उत्तर कोरियाने अण्वस्त्रांची निर्मिती केल्यास दक्षिण कोरियाही या स्पर्धेत येण्याची शक्यता आहे. शिवाय, जागतिक पातळीवरील दहशतवादी घडामोडी पाहता अण्वस्त्रांच्या संदर्भात अजूनही काही आव्हाने उभी ठाकण्याची शक्यता नाकारता येत नाही. शस्त्रास्त्रांची स्पर्धा करणा-या जगाची वाटचाल शांतेतच्या दिशेने होईल का, या प्रश्नाचे उत्तर मिळणे सध्या तरी अवघडच आहे. ■■

### प्रमुख संदर्भ

**(A) Magazines:** (1) Democracy reigns supreme in Sikkim? A long March and a short visit strains democracy for Lepcha marchers in Sikkim - Kerry Little, Australian Humanities Review, issue 48, Transforming Cultures eJournal, Vol. 5 No 1 June 2010 (2) Current Science, 10 June 2010 (3)The Economist, 24 July 2010.

**(B)Reports/Books:** (1) Improving Access and Efficiency in Public Health Services : Mid-term Evaluation of India's National Rural Health Mission, by Nirupam Bajpai, Jeffrey Sachs and Ravindra H. Dholakia, Sage Publications India Pvt. Ltd., New Delhi, 2010. (2) East, West, North, South - Major Developments in International Politics since 1945, Geir Lundestad, 6th Revised Edition, Sage Publications Ltd, London, 2010.

**(C)Websites:**(1)www.siblac.com(2) www.sandrp.in.hydropower (3)www.indianenvironmentalportal.org.in (4) www.ecoworld.com

### भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

**'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी**

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.



**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

## Poverty in India

**लेखक**

वि.म. दांडेकर नीळकंठ रथ

पृष्ठे १४० किंमत : २००/- रुपये

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## आजचे भारतीय अर्थचित्र आणि उद्याची आव्हाने

**- डॉ. सुबीर गोकर्ण**

अमेरिकेतील 'सबप्राइम' कर्जांच्या कोसळलेल्या डोला-यातून संपूर्ण जगाला कमीअधिक प्रमाणात आपल्या कवेत घेणारे वित्तीय संकट उद्‌भवल्याच्या घटनेला येत्या १५ सप्टेंबर २०१० रोजी दोन वर्षे पूर्ण होतील. त्या वित्तीय संकटाला तोंड देण्यासाठी देशोदेशीची सरकारे तसेच मध्यवर्ती बँकांनी सुसूत्रपणे उचित अशी धोरणे तातडीने आखून त्यांची परिणामकारकपणे आखणी केल्यामुळेच जागतिक अर्थव्यवस्था पुन्हा एकवार रुळावर येण्याची चिन्हे दिसू लागलेली आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेची नाळ वैश्विक अर्थकारणाशी जुळलेली असल्यामुळे या संकटाचे पडसाद आपल्या अर्थव्यवस्थेतही उमटले. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी केंद्र सरकार तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेने गेल्या दोन वर्षांत आवश्यक ती पावलेही उचलली. त्या उपाययोजनांचे अपेक्षित असे परिणामही व्यवहारात अनुभवास येत आहेत. २००८-०९ या वित्तीय वर्षात जागतिक वित्तीय संकटाच्या धक्क्याने प्रभावित झालेली भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा एकवार चांगल्यापैकी सावरत असल्याचे चित्र गेल्या वर्षभरात नजरेसमोर साकारते आहे. या पार्श्वभूमीवर, आगामी भविष्यात ज्या आव्हानांचा सामना भारतीय अर्थव्यवस्थेला करावा लागणार आहे, त्यांचा ऊहापोह करणे उद्‌बोधक ठरावे. त्याच प्रमाणे, भारतीय अर्थव्यवस्थापनातील सबलता-शबलतांचाही आढावा घेणे उपयुक्त ठरेल. बाह्य अर्थविश्वातील प्रवाह भविष्यात अनुकूल अथवा प्रतिकूल असे कसेही राहिले तरी आपली आर्थिक प्रगती सातत्यशील राखण्याच्या कोणत्या संधी व क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये विकसित झालेल्या आहेत, यांचाही लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे.



अमेरिकेतील वित्तीय संकट ज्या 'टॉक्सिक ॲसेट्स्'मुळे उद्‌भवले त्या 'टॉक्सिक ॲसेट्स्'च्या खरेदी-विक्रीपासून, मुळात, भारतीय बँका दूर राहिल्याने भारतीय बँकिंग तसेच वित्तीय क्षेत्र त्या संकटापासून आपसूकच बव्हंशी अस्पर्शित राहिले. 'सब्प्राइम' कर्जांच्या संकटाचे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जाणवलेले धक्के हे भारतीय अर्थव्यवस्थेची जागतिक अर्थव्यवस्थेबरोबर व्यापाराच्या माध्यमातून जी गुंफण अलीकडील काळात सघनपणे घडून आलेली आहे, तिच्यामुळे मुख्यतः जाणवले. भारतीय आयात तसेच निर्यातीच्या देशी ठोकळ उत्पादनाशी असलेल्या एकत्रित प्रमाणात गेल्या १० वर्षांत घडून आलेल्या वाढीसंदर्भातील आकडेवारी या वास्तवाची साक्ष पुरवते. भारताच्या आयात-निर्यातीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असलेले एकत्रित प्रमाण १९९८-९९ या वर्षांत २० टक्क्यांच्या आसपास होते. २००८-०९ या वित्तीय वर्षात हेच प्रमाण जवळपास ४१ टक्क्यांपर्यंत उंचावल्याचे दिसते. त्यामुळे, जागतिक स्तरावरील वित्तीय संकटापासून भारतीय अर्थव्यवस्था पूर्णपणे अलिप्त राहावी अथवा राहील, अशी अपेक्षाही अव्यवहार्यच ठरते.

भारतीय अर्थव्यवस्थेला या संकटाचे हादरे फार तीव्रतेने बसू नयेत यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक तसेच केंद्र सरकारने लगोलग पावले उचलली. मुख्य आव्हान होते ते भांडवल बाजारात रोखता पुरेशा प्रमाणात उपलब्ध राहील, यांबाबत काळजी घेण्याचे. त्या दृष्टीने भारतीय रिझर्व्ह बँकेने २००८ सालातील ऑक्टोबर महिन्यापासून ते २००९-१० या वित्तीय वर्षाच्या अखेरच्या तिमाहीपर्यंत - म्हणजेच जानेवारी ते मार्च २०१० या कालावधीदरम्यान - उदार अशा पैसाविषयक धोरणाचा अवलंब केला. तर, केंद्र सरकारनेही २००८-०९ या वित्तीय वर्षातील दुस-या सहामाहीमध्ये आयात कर तसेच अबकारी करात सवलती जाहीर करून भारतीय उद्योगक्षेत्राला दिलासा देणारी धोरणे राबविली. उदार अशा पैसाविषयक धोरणापायी भांडवल बाजारात मुबलक प्रमाणात रोखता उपलब्ध राहून त्याचा अपेक्षित परिणाम व्याजदरांची पातळी नरम राहण्यात दिसून आला. त्याची परिणती उद्योगांकरवी केल्या जाणा-या भांडवली गुंतवणुकीत/ खर्चात वाढ होण्यात घडून आली.

वित्तीय संकटाच्या झळा लागलेली भारतीय अर्थव्यवस्था सावरण्यास याचाच जोडीने, आणखी दोन बाबीही पूरकच ठरल्या. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी आणि शेतक-यांना देण्यात आलेली कर्जमाफी या त्या दोन बाबी. यामुळे दोन गोष्टी झाल्या. एक तर, समाजातील एका ब-यापैकी मोठ्या समूहाकडून उपभोगावरील खर्चात वाढ होण्याच्या वाटा विस्तारल्या. तर दुसरीकडे, सातबारा कोरा झाल्याने शेतकरी वर्गाकडून नव्याने कर्जउचल होऊन भारतीय शेतीमधील गुंतवणूक वाढण्याच्या शक्यताही व्यवहार्यतेच्या चौकटीत आल्या. या दोहोंचा टेकू भारतीय अर्थव्यवस्थेला लाभला. भारतीय वस्तुनिर्माण उद्योगक्षेत्रात २००९ सालातील एप्रिल महिन्यानंतर जी हलचल दृष्टोत्पत्तीस येऊ लागली तिचे बरेचसे श्रेय या सगळ्याच उपायात्मक योजनांकडे जाते. विशेषतः, दीर्घकालीन उपयोग-वापराच्या ग्राहकोपयोगी जिनसांची निर्मिती करणा-या उद्योगांनी या संदर्भात अग्रेसर भूमिका बजावली. ग्राहकोपयोगी वस्तू आणि भांडवली जिनसा तयार करणा-या उद्योगांना देशांतर्गत मागणीचा जो टेकू लाभला त्यामुळे भारतीय उद्योगक्षेत्राने ब-यापैकी लौकर आणि दमदारपणे मान उंचावली.

त्या मानाने, वैश्विक अर्थव्यवस्थेचे पुनरुत्थान मंद गतीने होताना दिसते. खरे म्हणजे, २००७ सालातील सप्टेंबर महिन्यापासूनच (म्हणजे, वित्तीय संकट उद्‌भवण्यापूर्वी तब्बल एक वर्ष) वैश्विक उत्पादनवाढीचा वेग उतरणीस लागला होता. १५ सप्टेंबर २००८ नंतर ही घसरण अधिक वेगाने आणि तीव्रपणे घडून आली. २००८ सालातील डिसेंबर महिन्यापासून जागतिक उत्पादनात सुरू झालेले घटीचे पर्व जवळपास २००९ सालातील सप्टेंबर महिन्यापर्यंत कायम राहिले. वित्तीय अरिष्ट अवतरण्याआधी - म्हणजे, २००७ सालात - जागतिक उत्पादनवाढीचा जो सरासरी वेग होता त्या वेगापर्यंत वैश्विक अर्थव्यवस्थेची गाडी पुन्हा पोहोचण्यास २०१० साल उजाडावे लागले. परंतु, वित्तीय अरिष्टाच्या भूकंपाचे केंद्र असणारी अमेरिकी अर्थव्यवस्था अजूनही सावरण्याच्या पंथावर नसल्याने जागतिक व्यापारवाढीचा वेग मात्र रडखडलेलाच दिसतो. अशा परिस्थितीत, भारतीय भांडवल बाजारात रोखतेची उपलब्धता समाधानकारक पातळीवर राखण्याबरोबरच महागाईवर नियंत्रण ठेवण्याची दुहेरी कसरत करावी लागणार आहे.



**भविष्यातील संधी आणि आव्हाने**

वित्तीय संकटाशी दोन हात करीत असतानाच आर्थिक विकासाच्या पथावरील वाटचालीची गती टिकवून ठेवण्याच्या ज्या क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आज विकसित झालेल्या दिसतात त्यांच्या आधारे भविष्यातील आव्हानांचा सामना करावयाचा तर हाताशी असलेल्या काही संधींचा लाभ उठविण्याचा नेट आपल्याला लावावा लागेल. यांतील पहिली संधी आहे ती 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'च्या रूपाने चालून आलेली. भारतीय लोकसंख्येमध्ये तरुणाईचे प्रमाण आजमितीस चांगलेच मोठे आहे. परिणामी, ज्याला आपण 'वर्किंग एज' म्हणतो, अशा 'वर्किंग एज'मधील भारतीय लोकसंख्येत येत्या १० वर्षांच्या कालावधीत (म्हणजेच २०२० सालापर्यंत) जवळपास १२ कोटींची भर पडण्याबाबतचे अंदाज लोकसंख्याशास्त्रज्ञांनी बांधलेले आहेत. तर, त्या नंतरच्या १० वर्षांत - म्हणजे, २०२० ते २०३० सालादरम्यान - आणखी १० कोटींची भर 'वर्किंग एज'मध्ये असणा-या आपल्या देशातील लोकसंख्येमध्ये पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. याचाच अर्थ हा की, आर्थिकदृष्ट्या उत्पादक स्वरूपाच्या आपल्या देशातील मनुष्यबळात आगामी दोन दशकांत मिळून जवळपास २२ कोटींची भर पडणार आहे.

आर्थिक प्रगतीच्याबाबतीत आपला स्पर्धक असणा-या शेजारी चीनमधील हेच चित्र याच कालावधीदरम्यान बरोबर आपल्या उलट असणार आहे. चिनी लोकसंख्येचे प्रौढीकरण होण्याची प्रक्रिया आता सुरू होते आहे. प्रौढत्वाकडे झुकलेल्या जवळपास १७ कोटी नागरिकांची भर येत्या दोन दशकांच्या कालावधीत चिनी लोकसंख्येत पडण्याबाबतचे अंदाज लोकसंख्याशास्त्रज्ञ वर्तवित आहेत. तर, आर्थिकदृष्ट्या उत्पादक वयोगटातील लोकसंख्येत याच कालावधीत घट घडून येणार आहे. त्यामुळे, योग्य प्रकारची धोरणे दूरदृष्टीने आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास चीनमध्ये एकवटत असलेले श्रमसघन उद्योग आपल्याकडे वळविणे भारताला भविष्यात शक्य बनू शकेल. 'उभ्या जगाचा कारखाना' असा जो लौकिक चीनने गेल्या तीन दशकांत संपादन केलेला आहे तेच बिरूद धारण करण्याची संधी भारतीय अर्थव्यवस्थेस सामोरी येते आहे.

परंतु, याच संधीच्या पोटात तितकेच सबळ आव्हान दडलेले आहे, याचा मात्र विसर पडता कामा नये. हे जटिल आव्हान असणार आहे ते इतक्या मोठ्या संख्येने श्रमदलात प्रवेश करण्यास सिद्ध असणा-या तरु ण होतकरू ना उत्पादक स्वरू पाच्या रोजगार संधी भारतीय अर्थव्यवस्थेत पुरेशा प्रमाणात निर्माण करण्याचे. त्यासाठी, भारतीय रोजगाराचे आज दिसणारे शेतीप्रधान रू प बदलावे लागेल. विकास प्रक्रिया सर्वसमावेशक बनण्यात अडथळा येतो आहे तो नेमका भारतीय रोजगाराच्या या शेतीप्रधानतेचाच. २००४-०५ सालासाठीची आकडेवारी बघितली तर मोठी लक्षवेधक बाब ध्यानात येते. देशाच्या ठोकळ देशी उत्पादनात जेमतेम २० टक्क्यांचा हिस्सा असणा-या शेतीसह एकंदरच प्राथमिक क्षेत्राचा रोजगारातील वाटा मात्र चांगला ५७ टक्क्यांचा असलेला दिसतो. तर, देशी ठोकळ उत्पादनात ६० टक्क्यांचा वाटा असणा-या सेवा क्षेत्राचा देशांतर्गत रोजगारातील हिस्सा मात्र दिसतो ३० टक्क्यांच्या परिघात ! हे चित्र बदलण्यासाठी श्रमशक्तीचे तोंड शेतीक्षेत्राकडून बिगर शेतीक्षेत्रांकडे वळविण्यावाचून गत्यंतर नाही. सर्वसमावेशक विकासाच्या धोरणांचा पाठपुरावा करणा-या जगभरातील सर्वच अर्थव्यवस्थांनी हाच पंथ अनुसरलेला दिसतो.

हे स्थित्यंतर भारतीय रोजगाराच्या आकृतिबंधातही घडून येण्याच्या दृष्टीने आपल्याला धोरणात्मक पावले उचलावी लागतील. त्यासाठी, कामगारविषयक विविध तरतुदींमध्ये लवचिकता आणणे, श्रमदलाची कौशल्यप्रधानता वाढविणे आणि श्रमिकांसाठी पर्याप्त असे सुरक्षाकवच निर्माण करणे अशी त्रिसूत्री अवलंबणे आवश्यक ठरेल. श्रमदलाची रोजगारक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने तंत्रकुशलता आणि तंत्रपारंगतता यांवर भर देणारी प्रशिक्षणप्रणाली विकसित करण्याच्या दिशेने सरकार, तंत्रप्रशिक्षण संस्था आणि संघटित उद्योग क्षेत्र यांनी संयुक्तरीत्या सक्रिय बनावे लागेल. शेतीकडून बिगर शेती व्यवसायांकडे श्रमशक्तीचे स्थलांतर ही वेगवान विकासाची अनिवार्य अट ठरते कारण बिगर शेती व्यवसायांमध्ये गुंतलेल्या श्रमिकांची उत्पादकता शेतीच्या तुलनेत चौपटीहून अधिक असल्याचे दिसते. त्यामुळे, शेतीमधील एक श्रमिक बिगर शेती व्यवसायाकडे वळविला तर ठोकळ देशी उत्पादनात तो चार एकक वाढ घडवून आणू शकतो.



परंतु, हे कामही सोपे नाही. कारण, श्रमशक्तीचे स्थलांतर शेतीकडून बिगर शेतीक्षेत्रांकडे घडवून आणावयाचे तर प्रथम पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीवर भरभक्कम खर्च करणे अनिवार्य बनते. सगळ्यात मोठे आव्हान आहे ते ऊ र्जानिर्मितीच्या क्षमतेमध्ये वाढ घडवून आणण्याचे. त्याच्याच जोडीने गुंतवणुकीचे तितकेच भरभक्कम 'इंजेक्शन' द्यावे लागणार आहे ते रस्त्यांच्या बांधकामांसाठी. भारत हा शहरीकरणाच्या प्रक्रियेत आघाडीवर असलेला एक देश आहे. त्यामुळे, पिण्याचे पाणी, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि शिक्षण यांसारख्या नागरी पायाभूत सेवासुविधांची मात्रा वाढविण्याबरोबरच त्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठीही प्रचंड गुंतवणूक गरजेची आहे. पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीसाठी करावयाच्या सरकारी नियोजित खर्चाचे ठोकळ देशी उत्पादनाशी असलेले प्रमाण २००६-०७ या वर्षामध्ये ५.४ टक्के इतके होते. ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या अंतिम वर्षापर्यंत, म्हणजेच, २०११-१२ या वर्षापर्यंत हेच प्रमाण ठोकळ देशी उत्पादनाच्या नऊ टक्क्यांवर नेणे आवश्यक बनणार आहे.

याहीपेक्षा खरे आव्हान असणार आहे ते प्रशासनाची 'डिलिव्हरी मेकॅनिझम' बुलंद बनविण्याची. हा प्रश्न, मुख्यतः संलग्न आहे तो 'गव्हर्नन्स'ची बाजू कार्यक्षम बनविण्याशी. हाच प्रश्न त्याच वेळी सरकारच्या वित्तीय व्यवस्थेचे संतुलन सांभाळण्याशीही गुंफलेला आहे. तेव्हा, रोजगारनिर्मिती, पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा आणि त्यांचा दर्जा उंचावणे, महागाईचे व्यवस्थापन आणि सरकारी वित्तीय व्यवस्थेचे संतुलन या चार आघाड्या आपण एकाच वेळी किती कार्यक्षमतेने सांभाळतो त्यावर भारतीय अर्थव्यवस्थेचे भविष्यकालीन चित्र अवलंबून असेल. ■■

***भारतीय रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर असलेल्या डॉ. सुबीर गोकर्ण यांनी १ जुलै २०१० रोजी पुणे येथे केलेल्या भाषणाचे शब्दांकन म्हणजे प्रस्तुत लेख होय. 'वित्तीय अरिष्टानंतरचे आर्थिक वास्तव आणि भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने' यांबाबत डॉ.गोकर्ण यांनी 'इक्फाय फौन्डेशन' या संस्थेच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमात केलेल्या सादरीकरणाचे हे शब्दरू प आहे.***